सीमित होणाऱ्या ग्राफिक कलाकृतींना भव्यता प्रदान केली. बारा-बारा फुटांच्या भव्य आकाराच्या प्रकाश चांदवडकरच्या कलाकृती पाहणे हा रोमांचकारी अनुभव असतो. तंत्रापलीकडे कलावंत गेला की, त्याच्यासाठी अमर्याद अवकाशाचे आव्हान असते. ते मर्यादांना कलावंताजवळ फिरकू देत नाही. त्यामुळेच आज प्रकाशने आंतरराष्ट्रीय कलाविश्वाला दखल घ्यायला लावली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात या तिशीतल्या कलावंताला मोठ्या सन्मानाने आमंत्रित केले जात आहे. गेल्या पाच वर्षांत प्रकाशला तीन आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले हा योगायोग नाही तर मर्यादांपलीकडे अट्टाहासाने जाण्याच्या प्रयत्नामुळेच त्याला हे यश प्राप्त झाले आहे.

या प्रकाश चांदवडकरचे पहिलेवहिले वैयक्तिक प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरीत भरविण्यात आले आहे. तीस-एक कलाकृतींचा आगळावेगळा आविष्कार मुंबईकरांना पहावयास मिळणार आहे. कलेच्या क्षेत्रात आज निश्चित दिशा देण्याऱ्या प्रदर्शनामध्ये त्याची गणना होईल हे निःसंशय. ■

## बरवे यांची असामान्यता

'बर्वे ते बरवे' हा गजानन भागवत यांचा (१० डिसेंबर ९५) लेख वाचला. 'आपणची आपला व्यायलो' या आध्यात्मिक शक्तीची कल्पना देणाऱ्या उक्तीप्रमाणे बरव्यांना त्यांचे दृक् हे नव्याने जन्म घ्यायचे, प्रसूत व्हायचे आणि त्यामागील नैसर्गिक प्रेरणा दृक्‌विषयी उत्स्फूर्त भाष्ये करून जायची.

स्वतःच्या दृश्य अनुभवाशी प्रामाणिक राहताना, तो प्रामाणिकपणा पुन्हापुन्हा तपासताना शुद्धतेचा शोध घ्यायचा अट्टाहास ते करत आणि म्हणूनच स्वतःस भावलेले, रुचलेले अमान्य करून त्याविषयी ते स्वतःतच एक वाद निर्माण करत.

त्या वादाचीच फलश्रुती म्हणजे त्यांच्या डायऱ्यांतील लिखाण, स्फुटे व 'कोरा कॅनव्हास!' संपूर्ण भारतीय कलाविश्वात पाश्चात्य अनुकरणाने जी 'आंधळी कोशिंबीर' रंगली आहे, त्या आंधळेपणाला डोळस करून दृष्टी देण्याची ताकद 'कोरा कॅनव्हास'मध्ये आहे.

**—प्रसन्न केशव घैसास,**
विरार (प.).